अहवाल क्रमांक १२५

पंचायत राज समिती
(२००८-२००९)

(अकरावी महाराष्ट्र विधानसभा)

चौथा अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या दहाव्या विधानसभेतील सन १९९७-९८ च्या सहाव्या अहवालातिल नाशिक,वर्धा व लातुर जिल्हा परिषदांच्या प्रशासन अहवालाच्या शिफारशीवर शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल)

(सदर अहवाल दिनांक २३ डिसेंबर, २००८ रोजी विधानसभेच्या / विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर.
२००८

पंचायत राज समिती
(२००८-२००९)

(अकरावी महाराष्ट्र विधानसभा)

चौथा अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या सन १९९७-९८ च्या सहाव्या अहवालातिल नाशिक,वर्धा व लातुर जिल्हा परिषदांच्या प्रशासन अहवालाच्या शिफारशीवर शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल)

पंचायत राज समिती

(२००८-२००९)
(दिनांक १४ ऑगस्ट २००८ पासुन)

समिती प्रमुख :
(१) श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स.

समिती सदस्य :
(२) श्री. नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.
(३) श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.
(४) श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.
(५) श्री. संपतराव अवघडे, वि.स.स.
(६) श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर) वि.स.स.
(७) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(८) श्री. पी.एन.पाटील, वि.स.स.
(९) श्री. सुभाष बने, वि.स.स.
(१०) श्री. राजेंद्र मुळक, वि.स.स.
(११) श्री. पदभाकर वळवी, वि.स.स.
(१२) श्री. डी.एस.अहिरे, वि.स.स.
(१३) श्री. आशिष जयस्वाल, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम सुर्वे, वि.स.स.
(१५) श्री. अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.
(१६) श्रीमती.अनुसया खेडकर, वि.स.स.
(१७) श्री. अतुल देशकर, वि.स.स.
(१८) श्री. टी.पी.कांबळे, वि.स.स.
(१९) श्री. विष्णु सवरा, वि.स.स.
(२०) श्री. हेंमत पाटील, वि.स.स.
(२१) श्री. राजन तेली, वि.प.स.
(२२) श्री. एम.एम.शेख, वि.प.स.
(२३) श्री. विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.
(२४) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
(२५) श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.अंनत कळसे,प्रधान सचिव
श्री.भा.ना.कांबळे,सह सचिव,
श्री.वि.वा.देशमुख,उप सचिव,
श्री.ता.नि.मिसाळ,अवर सचिव,
श्री.श.बा.गायकवाड,कक्ष अधिकारी
श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी

पंचायत राज समिती

(२००७-२००८)
(दिनांक १४ फेब्रुवारी २००५ पासुन)

समिती प्रमुख :

१.श्री.राजन पाटील,

समिती सदस्य :

२. श्री. नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.
३. श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.
४. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.
५. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.
६. श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर) वि.स.स.
७. श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.
८. श्री. ॲड.के.सी पाडवी, वि.स.स.
९. श्री. सुभाष बने, वि.स.स.
१०. श्री. राजेंद्र मुळक, वि.स.स
११. श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स
१२. श्री. सुनिल केदार, वि.स.स
१३. श्रीमती. मनिषा निमकर, वि.स.स
१४. श्री. कैलास पाटील , वि.स.स
१५. श्री. विश्वास नांदेकर, वि.स.स
१६. श्री संजय राठोड, वि.स.स
१७. श्री. अतुल देशकर, वि.स.स
१८. श्री. उत्तम इंगळे, वि.स.स
१९. श्री. साहेबराव घोडे, वि.स.स
२०. श्री. सदाशिव लोंखडे, वि.स.स
२१. श्री. रिक्त
२२. श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स
२३. श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स
२४. श्री. दिवाकर रावते, वि.प.स
२५. श्री. रामनाथ मोते, वि.प.स

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.अंनत कळसे,प्रधान सचिव,

श्री.भा.ना.कांबळे,सह सचिव,

श्री.वि.वा.देशमुख,उप सचिव,

श्री.ता.नि.मिसाळ,अवर सचिव,

श्री.श.बा.गायकवाड,कक्षअधिकारी

श्री.सुभाष नलावडे, कक्षअधिकारी

सन्मानीय सदस्य श्री.दिलीप कुमार सानंदा यांनी पंचायत राज समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या दिनांक २४ जुलै २००७ रोजी श्री.विजय वडेट्टीवार,वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणुन नामनियुक्ती करण्यात आली.श्री. शरद रणपिसे,वि.प.स यांची दिनांक २४ ऐप्रिल,२००८ रोजी मुदत संपल्यामुळे पद रिक्त आहे.

प्रस्तावना

मी,पंचायत राज समितीचा समिती प्रमुख,समितीने अहवाल अधिकार दिल्यावरुन समितीच्या सन १९९७-९८ च्या सहाव्या अहवालातील नाशिक, वर्धा व लातूर जिल्हा

परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालासंबधीच्या शिफारशीवर शासनाने केलेल्या कारवाईसंबधी अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

समितीचा सहावा अहवाल महाराष्ट्र उभय सभागृहांना दिनांक ११ एप्रिल, २००१ रोजी सादर करण्यात आला.

शासनाने समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईच्या संबधात जारी केलेले आदेश,परिपत्रके इत्यादी परिशिष्ट "अ" मध्ये समाविष्ट केले आहेत. शासनाकडुन आलेल्या माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक १३ मे २००८ रोजी विभागीय साक्ष घेतली.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये दिले आहे.
त्या अहवालातील समितीच्या शिफारशीवर शासनाने केलेली कारवाई विचारात धेतल्यानंतर समितीच्या अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केले आहेत.

श्री. एस.के गोयल,प्रधान सचिव,सहकारविभाग(अतिरीक्त कार्यभार,ग्राम विकास विभाग)
श्री. सुनिल चव्हाण, विशेष कार्य अधिकारी,
श्री. विदयाधर कानडे,प्रधान सचिव,वित्ती विभाग(व्यय)
श्री. एम.आर.कदम, शिक्षण संचालक(प्राथमिक) पुणे-१
श्री. दिपक चौधरी,मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री. जगन्नथ भोर,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.) नाशिक जिल्हा परिषद
श्री. प्रविण गेडाम, मुख्य कार्यकारी अधिकारी लातूर,जिल्हा परिषद
श्रीमती. लीना बणसोड,प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामविकास यंत्रणा,वर्धा जिल्हा परिषद यांनी समितीच्या कामकाजात दिलेल्या सहकार्याबद्दल समिती त्याची आभारी आहे.

सन २००८-२००९ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने दिनांक ९ सप्टेंबर,२००८ रोजी अहवाल विचारात घेऊन तो संमत केला.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ९ सप्टेंबर,२००८

सुभाष ठाकरे,
समिती प्रमुख,
पंचायत राज समिती.

अनुक्रमणिका

अनु-क्रमांक	प्रकरण क्रमांक	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(४)

जिल्हा परिषद,नाशिक (प्रशासन)

१	एक	अपहार करणाऱ्या ग्रामसेवकावर कारवाई करण्याबाबत.	१
२	दोन	जिल्हा परिषदांना मिळणारे अनुदान प्राप्त होईपर्यत येणाऱ्या अडचणी व पर्यायाने अनुदान परत करावे लागणे	७

जिल्हा परिषद,वर्धा (प्रशासन)

३	तीन	ग्रामसेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत.	१२
४	चार	ग्रामसेवकांनी किती रक्कम काढावी याबाबत मर्यादा घालणे.	१६
५	पाच	कमी वजनाचे लोखंडी पत्रे असल्याने परत करण्याबाबत.	१७

जिल्हा परिषद,वर्धा (प्रशासन)

६	सहा	गणवेश वाटपाबाबत.	२१
७	सात	प्राथमिक शाळा,बोरफळ,तालुका औसा,जिल्हा लातूर येथील विदयार्थ्यांना लेखन साहित्य न मिळाल्याबाबत.	२४

प्रशासन अहवाल

जिल्हा परिषद,नाशिक

एक :- अपहार करणाऱ्या ग्रामसेवकांवर कारवाई करणेबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २२ जुन २००० रोजी नाशिक जिल्हा परिषदे अंतर्गत कळवण पंचायत समितीला दिलेल्या भेटीच्या वेळी सन १९९७-९८ या एक वर्षात ग्रामसेवकांनी गैरव्यवहार केलेले ८ प्रकरण असल्याचे आढळून आले व या ८ प्रकरणांत रुपये २,११,१३५ इतकी रक्कम अडकून पडली असल्याचे समितीला सांगण्यात आले असून नाशिक जिल्हा परिषदेने उक्त रक्कमेपैकी फक्त रुपये ८८,०३० एवढीच रक्कम वसुल केली व उर्वरीत रुपये १,२३,१०५ च्या वसुलीची कारवाई सुरु आहे असे समितीला सांगितले. तसेच **गैरव्यवहार करणारे काही ग्रामसेवक सेवानिवृत्त झाल्याचेही समितीस सांगण्यात आले आहे. समितीच्या मते ही परिस्थिती योग्य नाही. सबब, वसुली करावयाची रक्कम १,२३,१०५ ची वसुली तातडीने करण्यात यावी. तसेच संबधितांकडून रक्कम वसुल केल्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यात देण्यात यावा अशी समितीने सहाव्या अहवालात शिफारस केली होती. ऐवढेच नव्हे तर ग्रामसेवकाडून होणारया गैरव्यवहाराचे मुख्य कारण हे ग्रामपंचायतीची तपासणी विहित कालावधीत न होणे हे असल्याचे समितीचे मत आहे त्यामुळे गट विकास अधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांना ग्रामपंचायतीची तपासणी वेळेवेळी करण्याचे निदेश विभागाने दयावेत अशीही समितीने आग्रहाची शिफारस केली होती.**

उपरोक्त शिफारशी संदर्भात जिल्हा परिषदेने केलेल्या कारवाईबाबत समितीला दिनांक ५ ऑक्टोबर २००१ रोजी पुरविलेल्या लेखी माहितीत असे नमुद केले आहे की,पचांयत समिती कळवण अंतर्गत एकूण ८ ग्रामपंचायतीकडील गैरव्यवहाराची रक्कम रु. २,११,१३५ पैकी रक्कम रु. १,७३,१३५ इतकी वसुल झालेली आहे. तर उर्वरीत रक्कम रु. ३८००० ची वसुली करावयाची कार्यवाही सुरूआहे.

<u>या प्रकरणी शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली::-</u>

वसुलपात्र रकमेची त्वरीत वसुली होण्याच्या दृष्टीने वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

ग्रामसेवकाडुन गैरव्यवहार होण्याचे मुख्य कारण ग्रामपंचायतीची तपासणी विहीत वेळेत न होणे, यास्तव गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांना ग्रामपंचायतीची वेळोवेळी

तपासणी करण्याचे निदेश दिल्यानुसार शासनाने याबाबत दिनांक २७ जुलै २००१ च्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदाना सुचना दिलेल्या आहेत. (परिशिष्ट 'अ')

समितीने केलेल्या उपरोक्त शिफारशी संदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिनांक ३ मे २००८ रोजी खालीलप्रमाणे पुन्हा पाठविण्यात आली आहे.

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेअंतर्गत कळवण पंचायत समितीला दिनांक २२ जुन २००० रोजी भेट दिली असता, सन १९९७-९८ या वर्षात आठ प्रकरणी ग्रामसेवकानी गैरव्यवहार केल्याचे आढळून आलेले होते. व त्यामध्ये रु २,११,१३५ गुंतलेले होते भेटीच्या वेळी त्यापैकी रु.८८,०३० वसुल करण्यात आलेले होते. व रक्कम रु १,२३,१०५ वसुल करणे बाकी होते.

त्यानंतर माहे जानेवारी,२००२ अखेर ८ प्रकरणापैकी ७ प्रकरणाची संपुर्ण रक्कम रुपये १,७३,१३५ वसुल करण्यात आली आहे. तथापि, वाजगाव ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्याकडे असलेली रक्कम रु ३८,००० वसुल न झाल्याने त्यांच्याविरुध्द दिनांक ७ मे २००१ रोजी पोलीस केस दाखल करण्यात आलेली होती. त्यामुळे सदर केसचा निर्णय होईपर्यत वसूली कुंठीत झालेली आहे. गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी, (ग्रा.प) यांना दरमहा ग्रामपंचायतीची तपासणी करावी याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच आता सदर प्रकरणी ग्रामसेवकांकडील वसूली पूर्ण झाली आहे.

विभागाकडून प्राप्त झालेल्या वरील माहितीच्या अनुषंगाने समितीने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी दिनांक १३ मे २००८ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना अशी विचारणा केली की, वाजगाव ग्रामपंचायतीच्या संरपचावर दाखल करण्यात आलेल्या केसचा पाठपुरवठा करण्यात येतो काय, असल्यास, याबाबत सुध्दा स्थिती काय आहे? त्यावर ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांनी समितीला असा खुलासा केले की, सन १९९७-९८ या वर्षात नाशीक जिल्हातील कळवण तालुक्यामध्ये ग्रांमसेवकानी केलेल्या गैरव्यवहाराची एंकदर ८ प्रकरणे आढळून आलेली आहेत. या सर्व प्रकारणामध्ये एकूण रुपये २,११,१३५ इतकी रक्कम गुंतवली आहे.ज्यावेळी पंचायत राज समितीने नाशिक जिल्हयाचा दौरा केला त्यावेळी गैरव्यवहाराच्या प्रकरणातील ८८,०३० रुपये वसुल करण्यात आले होते आणि रुपये १,२३,१०५ वसूल करणे बाकी होते.

आतापर्यंत रुपये १,७३,१३५ वसूल झालेले आहेत. जवाहार रोजगार योजनेच्या प्रकारणामध्ये संरपच आणि ग्रामसेवक यांच्यावर संयुक्त जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. सरपंचाकडून रुपये ३८,००० वसूल करावयाचे आहेत. दिनांक ०७ मार्च २००१ रोजी हे प्रकरण पोलीसात दाखल करण्यात आले आहे ते दोषी ठरल्यानंतर त्याच्याकडून वसुली करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्याकडून संपुर्ण वसुली करण्यात आली आहे. पुढे समितीने अशी पृच्छा केली की, या प्रकरणी संरपंचावर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही काय? त्यावर प्रधान सचिवानी असे नमूद केले की, सरपंच यांच्यावर पोलीस स्तरावर कारवाई सुरु आहे. दिनांक ५ मे,२००८ रोजी पोलिसांनी अहवाल दिलेला आहे. पोलिसांनी सरपंचावर ४०८, ४०९, ४६८, ४७७ आणि ३४ ही कलम लावलेली आहेत. न्याय दंडाधिकाऱ्याकडे दिनांक ८ नोव्हेंबर २००१ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आलेली आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्टआहे. मा.न्यायालयामध्ये चार्चशिट दाखल झालेली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपण त्यांच्या ७/१२ च्या उतारावर बोजा चढविणार आहात काय? त्यावर प्रधान सचिवानी असे सांगितले कि, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे आपण त्यांच्यावर कारवाई करु शकत नाही. दोष निश्चित झाल्यानंतर मा.कोर्टाच्या आदेशाप्रमाणे वसुलीची कारवाही करण्यात येईल.

ग्रामपंचायतीची तपासणी विहीत वेळेत न होणे यास्तव गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांना दिनांक २७ जुलै २००१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनेनुसार ग्रामपंचायतीची तपासणी वेळोवेळी करण्यात येते काय? असल्यास, एक वर्षात किती वेळ तपासणी करण्यात येते? अशी समितीने विचारणा केली असता प्रधान सचिवांनी समितीला असा खुलासा केला की, ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण दरवर्षी केले जाते. विस्तार अधिकारी त्याची तपासणी करतात. गैरव्यवहार आढळून आला तर वसुलीची कार्यवाही करण्यात येते. ग्रामसेवकाने गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले तर सखोल चौकशी करुन वसुलीची कार्यवाही केली जाते. समितीने पुढे अशी पृच्छा केली की, आपण यामध्ये काही सुधारणा करणार आहात काय? या संर्दभात सविस्तर चर्चा करुन आपण नवीन पध्दत अवलंबणार आहेत काय ? खाजगी माध्यमिक शाळांना आपण सी.ए चे लेखा परिक्षण मान्य केलेले आहे. त्यावर प्रधान सचिव यांनी समितीला असा खुलासा केला की, पंचायती राज संस्थामध्ये स्थानिक निधी लेखा परिक्षण दरवर्षी केले

जाते एका वर्षामध्ये सहा ग्रामसभा झाल्या पाहिजेत असा निर्णय घेण्यात आलेले आहे. मागील दोन महिन्याचा खर्चाचा अहवाल त्या सभेमध्ये ठेवला जातो. अर्थसंकल्प सादर केले जाते. ग्रामसभेने आर्थिक नियत्रंण ठेवावे अशी संकल्पना पुढे आलेली आहे. आणि त्यांचा चांगला परिणाम झालेला आहे. लेखा परिक्षकामार्फत अहवाल यावा आणि त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थावर नियत्रंण ठेवावे असे न करता लोकांनी नियत्रंण ठेवावी अशी तरतुद करण्यात आलेली आहे. सामाजिक लेखा परिक्षणा करिता जी समिती नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्या समितीच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. यामध्ये अजून काही सुधारणा करण्याची आवश्यकता असेल तर ती केली जाईल. सध्या ग्रांमपंचायतीची स्वत:ची लेखासंहिता नाही आता आपण ग्रामपंचायतीची लेखासंहिता तयार केलेली आहे.नियम तयार केलेले आहेत त्याचे प्रकाशन होऊन लोकांकडून सुचना सुध्दा आलेल्या आहेत. दिनांक ०१ एप्रिल, २००९ पासून प्रत्येक ग्रामपंचायतेसाठी जशी जिल्हा परिषदेची लेखासंहिता आहे. तशी ग्रामपंचायतीची लेखासंहिता अंमलात येईल आणि यामुळे निश्चितपणे फार मोठा बदल होईल असा समितीला खुलासा करण्यात आला. समितीने याबाबत असे मत व्यक्त केले की, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. सरपंचाकडून येणे बाकी असेल व त्यांच्यावर कागदोपत्री जबाबदारी निश्चित केलेले असेल तर त्याच्याकडून गैरव्यवहाराची रक्कम वसूल केली जाते काय? अशी समितीने विचारणा केली असता प्रधान सचिवांनी असा खुलासा केला की, सध्या असलेल्या कायदयातील तरतुदीनुसार त्याच्यावर जबाबदारी निश्चित करता येत नाही. फौजदारी गुन्हा करण्यापुर्वी न्यायालयामध्ये किंवा दिवाणी न्यायालयात दावा दाखल झाल्यानंतर कार्यवाही पुर्ण केली जाते. समितीने पुढे अशी पुच्छा केली की, सरपंच हा काही शासनाचा सेवक नाही. ग्राम सेवकाकडुन अपहारित रक्कमेची वसुली केली जाते.परंतु सरपंचाकडुन अपहारित रक्कमेची वसुली होत नाही समितीने याबाबत पुन्हा अशी विचारणा केली की, सरपंच ज्या रक्कमेचा अपहार करतात किंवा गैरव्यवहार करतात. त्या रक्कमेची वसुली करण्याबाबत कोणती यंत्रणा सध्या अस्तित्वात आहे.? त्यावर प्रधान सचिवांनी समितीला असा खुलासा केला की, ज्या प्रकरणामध्ये गैरव्यवहार झालेला असतो. त्या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल केला जातो. न्यायालयामध्ये गैरव्यवहारसंबधी चौकशी पूर्ण झाल्यानंतर आर्थिक बाबीचा विचार करुन दंड अधिक रक्कमेचा वसुलीचा आदेश दिला जातो. कलम १७८ अंतर्गत महसूल वसूली प्रमाणपत्र दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यामार्फत वसूली केली जाते. या संदर्भात

न्यायालयामध्ये केसचा निकाल लागल्यानंतर गैरव्यवहार झाल्याचे सिध्द होईल. चौकशी झाल्यानंतर शिक्षेची सुनावणी केली जाते. सुनावणी झाल्यानंतर अपहारीत रक्कमेची वसुली करावयाची किंवा नाही हे ठरविले जाते. जिल्हा परिषदेचा निधी एखादया व्यक्तीकडून येणे असल्याचे सिध्द झाल्यानंतर त्याच्यांकडून कलम १७८ अंतर्गत वसूली केली जाते. तसेच ही वसुली करीत असताना त्या व्यक्तीच्या मालमत्तेचा देखील विचार केला जातो.जिल्हा परिषदेमधील काही रक्कम अपहारीत झाली असेल व एखादया रक्कमेची येणे बाकी असेल तर ती रक्कम खाजगी व्यक्तीकडून वसूल करता येऊ शकते. एखादया कर्मचाऱ्याने जनतेच्या निधीमधील रक्कमेचा अपहार केला तर त्या व्यक्तिवर जबाबदारी निश्चित करण्याकरिता प्रशासकीय यंत्रणा असते. त्याची विभागीय चौकशी केल्यानंतर जबाबदारी निश्चित केली जाते. तसेच विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर रक्कम वसुल केली. जाते तसेच एखादया खाजगी व्यक्तीने काही रक्कमेचा अपहार केला तर जिल्हा परिषद पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत याच्या कायदयामध्ये कार्यवाही करण्याबाबत काही मर्यादा आहेत. ग्रामपंचायत मध्ये एखादा गैरव्यवहार झाला हे लेखा परिक्षणात सिध्द झाल्यानंतर न्यायालयात जाण्याचा प्रश्न उपस्थिती होत नाही. अशा प्रकरणी जिल्हा परिषदेच्या नियमानुसार संबंधीताच्या मालमत्तेवर बोजा बसविण्याबबाबत कोणती कार्यवाही करण्यात येईल, याची माहिती समितीने मागितली असता प्रधान सचिवांनी अशी माहिती दिली की, जिल्हा परिषद नियम १७० अनुसार महसुल वसुल प्रमाणपत्र मिळवण्याबाबतची कार्यवाही केली जाते. यासंबधी समितीने अशी पृच्छा केली की, संबधीतांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला आहे किंवा नाही. त्यावर प्रधान सचिवांनी असे सांगितले की, महसुल वसुली प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर बोजा चढविण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला आहे यासाठी संबधितांकडुन रक्कम येणे आहे, असे सिध्द होण्यापूर्वीच फौजदारी केस कशी करण्यात येते? याबाबंत प्रधान सचिवांनी असा खुलासा केला की, पोलिस अधिकाऱ्यांना एखादया केसमध्ये जर सकृतदर्शनी अपहार झाला आहे. असे लक्षात आले तर केस कोर्टापुढे पाठविली जाते.प्रस्तुत प्रकरणी पोलीस केस दाखल केली आहे, पुढे समितीने अशी विचारणा केली की, पदाधिकाऱ्यांकडून झालेल्या अपहरणातील रक्कमेची वसुली करण्यासाठी विभागामार्फत कोणती ठोस उपाययोजना करण्यात येणार आहे त्यावर प्रधान सचिवांनी समितीला असे सांगितले की, जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा, पंचायत

समिती, ग्राम पंचायत समिती यांनी महसुल वसुली प्रमाणपत्र मिळविण्याबाबत प्रशासनाला आदेश दिले पाहिजेत व संबंधिताकडून रक्कम वसूल केली पाहिजे.

अभिप्राय व शिफारशी :

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेअंतर्गत कळवण पंचायत समितीला भेट दिली.असता सन १९९७-९८ या वर्षात ग्रांमसेवकांनी गैरव्यवहार केलेल्या ८ प्रकरणात रु२,११,१३५ इतकी रक्कम अटकून पडली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यापैकी रु८८,०३० वसुल करण्यात आले होते व उर्वरित रक्कम रु १,२३,१०५ वसुल करण्याचे प्रंलबित होते. तसेच वरील रक्कमेपैकी आतापर्यत रक्कम रु१,७३,१३५ वसुल झालेले आहेत. जवाहर रोजगार योजनेच्या प्रकरणामध्ये संरपच आणि ग्रांमसेवक यांच्यावर संयुक्त जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्याकडून संपूर्ण वसुली करण्यात आली. त्याबाबत समितीने समाधान व्यक्त केले. पंरतु संरपंचाकडुन ३८,००० रुपये अदयाप वसुल करण्यात आलेले नाहीत. सदर प्रकरणी संरपंचावर पोलीस स्तरावर कारवाई सुरु असून न्याय दंडाधिकाऱ्याकडे दिनांक ८ नोव्हेंबर २००१ रोजी दोषारोपत्र दाखल केले असुन हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. असे समितीच्या निदर्शनास आले आहे.

विभागीय साक्षीच्या वेळी समितीने ग्राम पंचायतीचे लेखा परिक्षण विहीत मुदतीत करण्याच्या संदर्भातील मुद्दा उपस्थीत केला असता प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस असे विदीत केले की, ग्राम पंचायतीचे लेखा परिक्षण दरवर्षी केले जाते. विस्तीर अधिकारी त्याची तपासणी करतात गैरव्यवहार आढळून आला तर वसुलीची कार्यवाही करण्यात येते. चर्चेच्या ओघात त्यांनी समितीस अशी माहिती दिली की, नाशिक जिल्हा परिषदे मध्ये गैरव्यहाराची ५२४ प्रकरणे निदर्शनास आली असुन या प्रकरणामध्ये ३४१ लाख रुपयापर्यत गैरव्यवहार झाल्याचे सकृतदर्शनी दिसुन आले आहे. या ५२४ प्रकारणांपैकी २७ प्रकारणांमध्ये कारवाई करुन वसुलीची कार्यवाही केलेली आहे, अशीही माहिती त्यांनी दिली. प्रधान सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार नाशिक जिल्ह्यामध्ये गैरव्यवहाराची ५२४ प्रकरणे निदर्शनास आली. त्यापैकी फक्त २७ प्रकरणांमध्ये माहे मे, २००८ पर्यंत वसूलीची कार्यवाही झालेली आहे. म्हणजेच ४९७ प्रकरणे प्रलंबित आहेत. गैरव्यवहार झाल्याची प्रकरणे एवढ्या मोठया प्रमाणावर प्रलंबित असणे केव्हाही योग्य नाही. विभागाकडून गैरव्यवहाराच्या प्रकरणी तातडीने कार्यवाही

होऊन संबंधितांवर कडक कारवाई केली तरच कर्मचारी/अधिकाऱ्यांवर जरब बसून भविष्यकाळात अफरातफरीच्या व गैरव्यवहाराच्या प्रकरणांना आळा बसेल, असे समितीचे स्पष्ट मत आहे.

अंत: उपरोक्त ४९७ प्रकरणे ही केव्हापासून प्रलंबित आहेत, त्यामध्ये किती रकमेचा गैरव्यवहार झालेला आहे. त्यापैकी किती प्रकरणांमध्ये सद्य:स्थिती कारवाई पूर्ण झालेली आहे व उर्वरित प्रकरणे त्वरीत निकालात काढण्यासाठी काय प्रयत्न करण्यात येत आहेत. याबाबतची माहिती एक महिन्याच्या आत देण्यात यावी तसेच राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील गैरव्यवहाराची प्रकरणे तातडीने निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून विशेष मोहिम हाती घेण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

ग्रामसेवकाने भ्रष्टाचार केला असेल तर त्यांच्याकडून वसुली केली जाते. परंतु सरपंचाकडून वसुली केली जात नाही. तेव्हा उपरोक्त प्रकरणी सरंपचानी किती रकमेचा भ्रष्टाचार केला आहे हे तपासून घेऊन ही बाब न्यायालयामध्ये चौकशी पूर्ण करून गैरव्यवहार झाल्याचे सिद्व झाल्यानंतर अपहरीत रक्कम वसुलचे आदेश तत्काळ देण्यात यावेत. व त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्यात यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. एवढेच नव्हे तर ग्रामपंचायतीची तपासणी विहित वेळेत न होणे यास्तव गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांना दिनांक २७ जुलै २००१ च्या परिपत्रकान्वये वेळोवेळी ग्रामपंचायतीची तपासणी करण्याच्या ज्या सूचना दिलेल्या आहेत, त्यानुसार ग्रामपंचायतीची विहित वेळेत तपासणी करण्याबाबत गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांना पुन्हा सूचना देण्यात याव्यात. जे गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी विहित केलेल्या कालावधीत संबंधित ग्रामपंचायतीची तपासणी करणार नाहीत. त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी. तसेच होणाऱ्या विलंबास आळा बसण्याच्या दृष्टीने त्यांची वेतन वाढ रोखण्याची कार्यपध्दती जिल्हा परिषदेने अवलंबावी यासंदर्भात ग्राम विकास विभागाने जिल्हा परिषदेस सूचना द्याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

जिल्हा परिषदांमधील बरीच प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असताना, या प्रकरणांच्या संदर्भात वेळीच पाठपुरावा होत नसल्याने प्रकरण निकाली निघण्यास विलंब होतो ही बाब विचारात घेऊन जिल्हा परिषदांनी नियुक्त केलेल्या वकिलाकडील प्रकरणांचा नियमित आढावा

घेऊन सदरहू प्रकरणे शक्य तितक्या लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी ग्रामविकास विभाग व विधी व न्याय विभागाच्या मदतीने नियमावली तयार करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे या प्रलंबित प्रकरणाच्याबाबतीत त्रैमासिक अहवाल प्रत्येक जिल्हा परिषदेकडून ग्रामविकास विभागाने मागवून घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

तसेच सन २००१ पासून अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रत्येक जिल्हा परिषदेने आपल्या अखत्यारितील प्रकरणांचा निपटारा जलद गतीने करावा अशा प्रकारच्या सूचना विभागाने सर्व जिल्हा परिषदांना द्याव्यात व त्याबाबतचा विभागाने आढावा घ्यावा अशी ही समितीची आग्रहाची शिफारस आहे.

दोन : जिल्हा परिषदांना मिळणारे अनुदान प्राप्त होईपर्यंत येणाऱ्या अडचणी व पर्यायाने अनुदान परत करावे लागणे.

पंचायत राज समितीने राज्यातील जिल्हा परिषदांच्या केलेल्या तपासणीत जिल्हा परिषदांना शासनाकडून मिळणारे अनुदान वेळीच प्राप्त होत नसल्यामुळे त्याचा जिल्हा परिषदाने हाती घेतलेल्या विकास कामावर फार मोठया प्रमाणावर परिणाम होतो असे समितीला दिसून आले काही वेळा तर लेखा शीर्षाखालील अनुदाने जिल्हा परिषदांना मार्च महिन्याच्या शेवटी शासनाकडून प्राप्त झाल्याची उदाहरणे समितीला आढळली. काही लेखा शीर्षाखाली गरजपेक्षा अधिक अनुदान मिळाल्यामुळे निधी अखर्चीत राहून तो शासनाला परत करावा लागल्याचीही अनेक उदाहरणे समितीला जिल्हा परिषदेच्या केलेल्या तपासणीअंती आढळून आले आहे एकीकडे वर्ष अखेरीस निधी प्राप्त होणे परिणामत: त्याचा विकास कामावर परिणाम होणे तर दुसरीकडे काही लेखा शीर्षाखाली फार मोठा निधी प्राप्त झाल्यामुळे उक्त निधी अखर्चित राहिल्यामुळे शासनाला परत करावा लागणे असे एकंदर चित्र समितीच्या निदर्शनास आले आहे. अशा बाबी अंदाजपत्रक तयार करताना योग्यरित्या खर्चाचा उचित अंदाज न केल्यामुळेही घडतात असे समितीचे रास्त मत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदांनी त्यांचेकडे असलेले वर्षभरातील कार्यक्रम इतर विकासाच्या योजना याचा वास्तविकरित्या अंदाज बांधून मूळ अथवा सुधारित अंदाजपत्रक तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. ग्रामविकास सचिवांनी शासनाकडून अनुदाने योग्य वेळी न मिळणे किंवा निधी अखर्चित राहिल्यामुळे ती जिल्हा परिषदांनी शासनास परत करणे या बाबी टाळावयाच्या असतील तर जिल्हा परिषदांच्या

मूळ अंदाजापैकी काही टक्के रक्कम सुधारित अंदाजपत्रक तयार होण्यापूर्वीच जिल्हा परिषदांना देणे हा एक उपाय असल्याचे समिती समारे प्रतिपादन करण्यात आले आहे. तसेच वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी शासनाकडून जिल्हा परिषदांना अनुदाने वेळीच न मिळण्याची कारणमिमांसा करताना जिल्हा परिषदांकडून सुधारित अंदाजपत्रके शासनास प्राप्त होण्यास विलंब लागतो असे एक कारण सांगण्यात आले आहे. नगरपरिषदांना ज्याप्रमाणे तिमाही अनुदान देण्यात येते. अशा प्रकारे जिल्हा परिषदांना तिमाही अनुदान वितरीत करता येईल काय, या समितीच्या पृच्छेसंदर्भात वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी विशद केले की, जिल्हा परिषदांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च पुढील वर्षापासून परस्पर घेण्याचा विचार सुरु आहे. त्यामुळे विकास कामासाठी देण्यात येणाऱ्या निधीचा प्रश्न फक्त शिल्लक राहतो. जिल्हा परिषदांकडून सुधारित अंदाजपत्रके वेळीच प्राप्त झाल्यास शासनाकडून निधी वितरीत होण्यास विलंब होणार नाही असेही स्पष्ट करण्यात आले. तसेच जिल्हा परिषदांच्या विकास कामांना जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न असतो असेही सांगण्यात आले.

वसूल केलेला उपकार थेट ग्रामपंचायती तसेच जिल्हा परिषदांना देण्यात काय अडचणी आहेत या समितीच्या पृच्छेवर शासनासाठी विविध विभाग कर जमा करतात. सर्व विभागामार्फत जमा होणारा कर शासनाकडे जमा झाला पाहिजे. शासनासाठी जमा झालेला कर परस्पर इतर विभागांना द्यावयाचा असेल तर याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता वित्त विभागाच्या प्रतिनिधींनी समिती समारे प्रतिपादन केली.

शासनाकडून अनुदान उशीरा मिळाल्यामुळे जिल्हा परिषदामार्फत घेण्यास येणाऱ्या विकास कामात होणारा विलंब टाळण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी समितीला सांगितल्याप्रमाणे जिल्हा परिषदांच्या मूळ अंदाजपत्रकाच्या काही टक्के निधी शासनाने सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वीच घेता येईल काय याची तपासणी करुन त्याचा अहवाल सहा महिन्यात समितीला सादर करण्यात यावा. तसेच पुढील वर्षापासून जिल्हा परिषदांच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वेतन थेट कोषागारामार्फत देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे असे समितीला सांगण्यात आले असल्याने त्याप्रमाणे या प्रस्तावावर त्वरित निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी अशी समितीने आपल्या सहाव्या अहवालात शिफारस केली होती.

तसेच शासनाकडून जिल्हा परिषदांना मिळणारे अनुदान हे विभागीय आयुक्त त्यानंतर जिल्हाधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांकडून अंतिमत: ते जिल्हा परिषदांना प्रदान करण्यात येते. ही कार्यपध्दती जिल्हा परिषदांना अनुदान मिळण्यास होणाऱ्या विलंबास कारणीभूत असल्याचे जिल्हा परिषदांच्या अधिकाऱ्यांनी समितीस सांगितले. जिल्हा परिषदांना मिळणारे अनुदान विलंब टाळून वेळीच मिळण्याच्या दृष्टिकोनातून या कार्यपध्दतीत सुधारणा करण्यात यावी अशीही समितीची शिफारस होती.

या शिफारशी संदर्भात शासनाने खालील प्रमाणे कारवाई केली आहे:-

शासनाने जुलै, २००७ पासून नवीन अर्थसंकल्पीय संगणक प्रणाली सुरु केलेली असून मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे जिल्हा परिषदांना दरमहा निधीचे वाटप केले जाते. त्यामुळे वर्ष अखेरीस मोठया प्रमाणात रकमा शिल्लक राहत नाहीत. मात्र सुधारीत अंदाजास विधिमंडळाची मान्यता साधारणत: मार्चच्या तिसऱ्या आठवडयात होते. त्यानंतर मार्च अखेरीस सुधारित अंदाजाप्रमाणे अनुदान वितरीत केले जाते.

जिल्हा परिषदांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोषागारामार्फत थेट वेतन देण्याची पध्दती सुरु करणे या संदर्भात शासनाने खालील प्रमाणे कारवाई केली आहे:-

शासन निर्णय क्रमांक ग्राम विकास विभाग बीजीटी १०००/प्र.क्र.४५८७/२९, दिनांक १ नोव्हेबर, २०० अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान संबंधित प्रशासकीय विभागांकडून कोषागारामार्फत थेट दिले जाते.

तसेच जिल्हा परिषदांना मिळणारे अनुदान विलंब टाळून वेळीच मिळण्याचा दृष्टीकोनातून या कार्यपध्दतीत सुधारणा करण्यात यावी. अशी समितीने शिफारस केलेल्या संदर्भात शासनाने खालील कार्यवाही केली आहे:-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १५५ (१) व १५५ (२) नुसार जिल्हा परिषदांना उपकर वाढीच्या प्रस्तावांना मंजुरी देण्याचे शासनाला असलेले अधिकार विभागीय आयुक्तांना देण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम १५५ (१) व १५५ (२) ला सुधारणा केलेली अधिसूचना दिनांक ११ ऑगस्ट, २००३ रोजी **शासन राजपत्रात** प्रसिध्द करण्यात आली आहे.

जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्काची अदाई जिल्हा स्तरावर थेट उपलब्ध होण्यासाठी महसूल विभागाच्या शासन निर्णय क्र. मुद्रांक २००२/२४/प्र.क्र..३३४/म-१, दिनांक २२ सप्टेंबर, २००३ अन्वये आदेश पारीत करण्यात आले आहेत. सदर आदेशान्वये जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्काची थेट अदाई करण्याकरिता वजा परतावा पध्दत निश्चित करण्यात आली आहे. मात्र दिनांक २३ व २४ नोव्हेंबर, २००४ रोजी मंत्रालयात झालेल्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या बैठकीत मुद्रांक शुल्क अनुदानाच्या थेट अदाई पध्दतीबाबत आढावा घेतला असता अनेक जिल्हा परिषदेची देयके, कोषागारात जमा झालेल्या मुद्रांक शुल्कांच्या रकमेच्या ताळमेळांसंदर्भात आक्षेप लावून कोषागार कार्यालयाने परत जमा झालेल्या संबंधितांकडून सांगण्यात आले. त्याचप्रमाणे थेट अदाईच्या पध्दतीमध्ये फॉर्म ४३ मध्ये देयक सादर करण्यासाठी विहित केलेल्या पध्दतीमध्ये तांत्रिक अडचणी उद्‌भवत असल्याचे बहूतांश जिल्हा परिषदेकडून कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने मुद्रांक शुल्काच्या थेट अदाईच्या पध्दतीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने वेळोवेळी महसूल विभागाचे अधिकारी, वित्त विभागाचे संबंधित अधिकारी आणि संचालक, संचालयीन लेखा व कोषागोर यांच्यासह या विभागातील बैठका घेण्यात येऊन, थेट अदाईची पध्दत अंमलात आणण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. महसूल व वन विभागाच्या दिनांक २२/९/२००३ च्या आदेशानुसार विहित केलेल्या वजा परतावा पध्दतीबाबत काही तांत्रिक अडचणी उद्‌भवल्या कारणाने ही पध्दत सद्य:स्थितीत अंमलात आणणे शक्य झालेले नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत मुद्रांक शुल्क अनुदान हे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत पूर्वीच्याच पध्दतीनुसार वितरीत करण्यात येत आहे.

मुद्रांक शुल्क थेट अदाई पध्दतीने पारीत करण्यासंबंधात माहे जानेवारी, २००८ मध्ये वित्त विभागाचे उप सचिव (श्री. संतोषकुमार) यांचेकडे महसूल विभागाचे अधिकारी, संचालक संचालनास लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई व ग्रामविकास विभागाचे उप सचिव (वित्त) यांच्यासह सांगोपांग चर्चा झाली. तसेच पुन्हा संबंधितांसह बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उप सचिव (वित्त) यांनी संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना उक्त प्रकरणी नमुना विहित केलेल्या नमुना ४३ मध्ये (मु.पो.नि., १९६८ मधील) आवश्यक ती सुधारणा करुन जिल्हा परिषदांना थेट अदाई असे सूचित केले. महसूल व वन विभागानेही उपकाराची रक्कम थेट अदा करण्यासाठीची पध्दत विहित केलेला नाही.

समितीने केलेल्या शिफारशीसंदर्भात शासनाने पुन्हा खालील प्रमाणे खुलासा केला :-

शिफारशीचा सारांश :- (१) जिल्हा परिषदेने मूळ व अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक योग्य पध्दतीने तयार करावे म्हणजे, बचत किंवा अखर्चित रकमा राहणार नाही.

केलेली कार्यवाही :- स्वनिधीच्या बाबतीत हे अभिप्राय योग्य आहेत. जिल्हा निधी किंवा अभिकरण निधीबाबत असे नियंत्रण जिल्हा परिषदेला ठेवता येऊ शकत नाही. जिल्हा निधीबाबतही उपकर, मुद्रांक शुल्क इत्यादी महत्वाच्या उत्पन्नाच्या बाबीबाबत शासनाकडून राहणाऱ्या अनुदानावर अवलंबून रहावे लागते.

शिफारशीचा सारांश :- (२) मूळ अंदाजापैकी काही टक्के रक्कम सुधारित अंदाजपत्रक तयार होण्यापूर्वी जिल्हा परिषदांना देणे हा एक उपाय होऊ शकतो.

केलेली कार्यवाही :- वित्त विभाग व ग्राम विकास विभाग या दृष्टीने प्रयत्नशील असतो.

शिफारशीचा सारांश :- (३) जिल्हा परिषदांकडून सुधारित अंदाजपत्रक वेळीच प्राप्त झाल्यास निधी वितरणास वेळा लागणार नाही.

केलेली कार्यवाही :- सुधारित अंदाजपत्रक मान्य होण्याचा दिनांक हा मार्चच्या शेवटच्या १० दिवसात असतो. त्यामुळे तत्पूर्वी जिल्हा परिषदांना सुधारित अंदाजपत्रके देऊन त्यावरुन राज्याच्या अर्थसंकल्पिय तरतुदी तयार होतात. मात्र मान्यतेशिवाय वितरण करणे शक्य नाही.

शिफारशीचा सारांश :- (४) जिल्हा परिषदाना थेट उपकर व मुद्रांक शुल्क अदा करण्याबाबत.

केलेली कार्यवाही :- सदर निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत झाला असून सदर विधेयकात विधिमंडळात मान्यता घेण्यात आली आहे व सदर अधिसूचना दिनांक ११ ऑगस्ट, २००३ रोजी प्रकाशित झाली आहे त्यामुळे यापुढे सदर अनुदानाची वाट जिल्हा परिषदांना पहावी लागणार नाही.

शिफारशीचा सारांश :- (५) जिल्हा परिषदांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोषागारामार्फत थेट वेतन देण्याची पध्दती सुरु करणे.

केलेली कार्यवाही :- ग्रामविकास विभागाच्या वेतन अदाईची योजनेची अंमलबजावणी सुरु झालेली नाही. सध्या वित्त विभागची अंतरिम योजना चालू आहे. त्यामध्ये प्रत्येक प्रधान

शिर्षाखाली सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे एकत्रित वेतन अनुदान देण्यात येते. ग्रामविकास विभागाच्या योजनेत कोषागारात व उपकोषागारामार्फत सध्या राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीची अदाई होते तशी अदाई जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची होणे अपेक्षित आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात वेतनासाठी अग्रिम देण्याचे टळेल व इतर आर्थिक शिस्तही वाढीस लागेल. ग्रामविकास विभाग सदर योजनेसाठी प्रयत्न करीत आहे.

शिफारशीचा सारांश :- (६) जिल्हा परिषदांना मिळणारे अनुदान विलंब टाळून वेळीच मिळण्याच्या दृष्टीने कार्यपध्दतील सुधारणा करणे.

केलेली कार्यवाही :- उपकर व मुद्रांक शुल्क थेट अदाई बाबत निर्णय झालेला आहे. पाणीपट्टी व वन महसूल बाबत लवकरच निर्णय अपेक्षित आहे. जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वेतन अदाईबाबत वर विशद केल्याप्रमाणे निर्णय अपेक्षित आहे. योजना अनुदान अर्थोपाय अग्रिमाद्वारे ग्रामविकास विभागामार्फत वित्त विभागाच्या परवानगीनंतर दिले जाते. ग्रामविकास विभाग तत्पर वितरणासाठी प्रयत्न करीत आहे. थकबाकी अदाईसाठी सुध्दा पाठपुरावा करीत आहे. परंतु वितरणास परवानगी वित्त विभाग साधनसंपत्तीच्या उपलब्धतेवर देत असतो. तरी जिल्हा परिषद स्वनिधीतील प्रमुख घटक उपकर व मुद्रांक शुल्काबाबत यापुढे अडचण येणार नाही.

अभिप्राय व शिफारशी :-

मूळ व सुधारित अंदाजपत्रक सादर करताना जिल्हा परिषदांना मिळणारे अनुदान प्राप्त होईपर्यंत येणाऱ्या अडचणी व पर्यायाने अनुदान परत करावे लागणे या संदर्भात समितीने केलेल्या शिफारर्शींवर शासनाने केलेली कार्यवाही विचारात घेता समितीचे समाधान झालेले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी समितीचे कोणतेही अभिप्राय व शिफारशी नाहीत.

जिल्हा परिषद, वर्धा (प्रशासन)

तीन : ग्रामसेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत

राज्यामध्ये सुमारे १४,००० ग्रामसेवकांचे पदे रिक्त असून ती भरण्यास शासनाने अद्याप पर्यंत परवानगी दिली नसल्याचे समितीला सांगण्यात आले. ग्रामसेवकांकडे ग्रामपंचायतीची वसुली ग्रामपंचायतीच्या स्तरावर मालमत्तेचे अभिलेख व बैठकीचा कार्यवृतांत लिहिणे अशी बरीच कामे असतात. एका ग्रामसेवकास ३-४ ग्रामपंचायतीची कामेही सध्या करावी लागत

आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीची कामे नीटशी होत नाहीत. असे समितीला तपासणीअंती आढळून आले आहे. तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायक यांना ३-४ गांवे दिलेली असतात. म्हणून हे कर्मचारी एकाही गावाला व्यवस्थितरित्या न्याय देऊ शकत नाही असे समितीला आढळून आले आहे. त्यामुळे तलाठी, कृषि सहायक व ग्रामसेवक ही तीनही पदे एकत्रित करण्यात यावीत. अशी पदे एकत्रित केल्याने सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास या तीनही कामास आवश्यक असलेले प्रशिक्षण दिल्यास तीनही पदांचे काम एकच कर्मचारी करु शकेल त्यामुळे गाव पातळीवर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त राहणार नाहीत. म्हणून एक गाव एक कर्मचारी या पद्वतीने नियोजन करण्यासाठी एक अभ्यास गट निर्माण करुन यांचा अभ्यास करण्यात यावा. या अभ्यास गटाचा अहवाल समितीस सहा महिन्यांत देण्यात यावा अशी समितीने आपल्या सहाव्या अहवालात आग्रहाची शिफारस केली होती.

उपरोक्त शिफारशी संदर्भात शासनाने केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे:-

महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य आहे. त्यामुळे महाराष्ट्राने वेगवेगळया वैशिष्ट्यपूर्ण सेवा तयार केल्या आहेत व त्याचा परिपाम म्हणून तलाठी, ग्रामसेवक व कृषि सहायक ही पदे निर्माण केली आहेत. प्रत्येक कामाचा व्याप, स्वरुप, आवाका व कामासाठी आवश्यक पात्रता वेगवेगळया आहेत. त्यात तलाठी या पदाचा व्याप जास्त वैविध्यपूर्ण (diversified) आहे. निवडणुकांपासून कृषि गणनेपर्यत वेगवेगळी कामे तलाठ्यास करावी लागतात व महसूल प्रशासन ही कामे गेली अनेक वर्ष समर्थपणे राबवित आहे. ही पदे एकत्र केल्यास एकही काम व्यवस्थित होणार नाही. तसेच खालच्या स्तरापासून वरच्या स्तरापर्यत प्रशासन व्यवस्थितपणे राबविता येणार नाही. तसेच पर्यवेक्षण परिणामकारक होऊ शकणार नाही. या यंत्रणा गाव पातळीवर वेगवेगळया नसून वरच्या स्तरावरही वेगवेगळया आहेत. ग्रामसेवकाचे नियंत्रण, गट विकास अधिकारी, तलाठयाचे नियंत्रण तहसिलदार व कृषी सहायकांचे नियंत्रण कृषी खात्याकडे आहे. जिल्हा पातळीवर या विभागचे नियंत्रण जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे स्वतंत्रपणे आहे. मुळातच या यंत्रणांवर ताण खुपच आहे. यांचे केंद्रीकरण झ ाल्यास प्रशासनावर विपरीत परिणाम होईल. नवीन व्यवस्थेत नियंत्रण कोणी करायचे हा प्रश्न निर्माण होईल. ज्या यंत्रणेकडे प्रशासन, कायदा व सुव्यवस्था वगैरे नियंत्रणाचे काम आहे. त्यांचेकडेच विकासाचे अधिकार सोपविल्यास नियंत्रणाचे अधिकार परिणामकारकरित्या राबविता

येणार नाही. तसेच विकासाचे काम करणाऱ्या यंत्रणेस नियंत्रणाचे अधिकार दिल्यास तेही व्यवस्थित होणार नाही. भूमि अभिलेख हे महत्वाचे दस्ताऐवज आहेत. दिनांक ९ ऑक्टोबर, २००१ रोजी मेकन्झी कंपनीने महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळासमोर सादरीकरण केले. त्यामध्ये योग्य पध्दतीने भूमि अभिलेख ठेवण्याचे महत्व विषद केले. १९६० च्या दशकात ही पदे एकत्र करण्याचा काही काळ प्रयोग केला होता. त्या गुंतागुंत वाढली होती. आता पदे एकत्र करणे म्हणजे पुन्हा मागे जाणे आहे. कृषी सहायक या पदास तांत्रिक ज्ञानांची आवश्यकता आहे व या भिन्न आवश्यकतेमुळे प्रशासन सुलभ होण्याच्या ऐवजी गुंतागुंत होण्याची शक्यता आहे. कृषी विभागातील कृषी सहायक हे गाव पातळीवर शेतीशी संबंधित कृषी विस्तार, मृदासंधारण, फलोत्पादन इत्यादी कामे करीत असतात. त्यातील कामे तांत्रिक स्वरूपाची असल्याने त्यास तांत्रिक अर्हता धारण करणे आवश्यक असते त्यामुळे सदर कामे ही अशी अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून करणे आवश्यक आहे. त्यामुळे एक गाव कर्मचारी या पध्दतीने नियोजन करण्यासाठी ग्रामसेवक, तलाठी व कृषी सहायक ही पदे एकत्रित करता येत नाहीत.

ग्रामसेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत समितीने केलेल्या शिफारशीसंदर्भात शासनाने कार्यवाही केली असून सदर प्रकरणी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १३ मे, २००८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी उपरोक्त लेखी उत्तरात कळविल्यानुसार खुलासा करून समितीस असे विदित केले की, या तीनही पदांची कामे वेगवेगळया स्वरूपाची आहे ती एकत्र केली तर अधिक गुंतागुंत निर्माण होऊ शकते. त्यामुळे एकत्र संवर्ग निर्माण करण्याची संकल्पना शासनाने मान्य केली नाही. त्यावर समितीने अशी पृच्छा केली की, कृषि सहायक आणि ग्रामसेवकाचा विचार करावयाचा झाला तर बहुतांशी गावात कृषी सहायक आढळून येत नाहीत. ग्रामसेवक लोकप्रतिनिधींना कधी कधी उपलब्ध होतात. त्यामुळे कृषि सहायक आणि ग्रामसेवक ही पदे एकत्रित करण्याबाबत फेरविचार करावा. याबाबत प्रधान सचिवांनी असा खुलासा केला की, घटना दुरूस्ती झाल्यानंतर कृषी संबंधी विकासाची कामे जिल्हा परिषदेला सुपूर्द करण्यात यावीत अशी शिफारस करण्यात आली. ही कामे जिल्हा परिषदेला सुपूर्द केल्यानंतर कृषी सहायक हा संवर्ग जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आला. कृषीची कामे अतिशय

वैशिष्टपूर्ण आहेत. त्यामुळे कृषी विकास आणि ग्राम विकास असे दोन भाग केले पाहिजे. समितीने पुढे असे सूचित केले की, कृषी विकासाबाबत वरिष्ठ पातळीवरील कार्यालये खास करुन वैशिष्ट्यपूर्ण झाली असली तरी खालच्या स्तराची अवस्था चांगली नाही. ग्रामीण भागात जे डेमो फार्म प्लॉट तयार करण्यात आले आहेत त्यांची अवस्था बघितली तर आपल्या लक्षात येऊ शकेल त्या ठिकाणी कोणतेही संशोधन होत नाही. शेतकऱ्यांना योग्य ती माहिती दिली जात नाही. जे प्रत्यक्ष शेतीसाठी असलेले भूखंड आहेत तेच ओसाड आहेत अशी स्थिती आहे. त्यामुळे ज्या कल्पनेने ही योजना तयार करण्यात आली होती तो उद्देश सफल होत नाही. म्हणून कृषी सहायक आणि ग्रामसेवक ही पदे एकत्रित करावीत. त्यावर प्रधान सचिवानी असे सांगितले की, समितीने जी शिफारस केली आहे ती अजूनही शासनाच्या विचारीधीन आहे. त्याबाबत शासनाने अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नाही. शासन जो निर्णय घेईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

जर ही सर्व पदे एकत्रित करता येणे सध्या शक्य नसेल तर किमान माननीय मंत्र्यांनी विधानसभेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीचा एक ग्रामसेवक उपलब्ध करुन देण्याबाबतचे जे आश्वासन दिले आहे, ते तरी शासनाने तातडीने पूर्ण करावे, असे केले तर अनेक प्रश्न सुटू शकतील. किती दिवसात ग्रामसेवकांची भरती करण्यात येणार आहे? याबाबत प्रधान सचिवांनी असा खुलासा केला की, माननीय मंत्र्यानी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मंत्रिमंडळाला सादर करावयाच्या प्रस्तावाचे काम सुरु आहे. वित्त विभागाने या संदर्भात असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, या आश्वासनाची पूर्तता करावयाची झाल्यास राज्यात एकूण ९००० ग्रामसेवकांची पदे निर्माण करावी लागतील. एकाच वेळी ९००० पदे न भरता प्राधान्य ठरवून टप्प्याटप्प्याने ती भरावीत. सध्या १००० ते २००० लोकसंख्येपर्यत २००० ते ३००० लोकसंख्येपर्यत व ३००० पुढील लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी वेगवेगळया प्रमाणात ग्रामसेवकांची सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. प्राधान्यक्रम ठरवितांना २००० ते ३००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीला एक स्वतंत्र ग्रामसेवकाचे पद भरावे लागेल, १००० पेक्षा कमी व १००० ते २००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी दोन ग्रामपंचायत मिळून १ ग्रामसेवक देण्यात येतो. पहिल्या टप्प्यामध्ये १००० ते २००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक ग्रामपंचायतीला स्वतंत्र ग्रामसेवक आणि १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती शेजारच्या ग्रामपंचायतीला

जोडून त्या ठिकाणी एक ग्रामसेवक दिला जावा. असे केले तर पहिल्या टप्प्यामध्ये ५००० ग्रामसेवकांची पदे भरावी लागतील. दुसऱ्या टप्प्यात ४००० पदे भरावी लागतील. पहिली ५००० पदे येणाऱ्या तीन वर्षात भरावीत. तीन वर्षाचा पहिला टप्पा संपल्यानंतर उर्वरित ४००० पदे भरावीत असा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. पद निर्मितीसाठी त्रिस्तरीय समिती निर्माण करण्यात आली आहे. ग्रामसेवकांचा आकृतिबंध अद्याप तयार करण्यात आलेला नाही. ग्रामविकास विभागाअंतर्गत असणाऱ्या इतर सर्व पदांचा आकृतिबंध तयार करण्यात आला आहे. या आकृतिबंधाला जर त्रिस्तरीय समितीने मंजुरी दिली तरी ही पदे निर्माण करु शकतो. अशा वेळी हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे नेण्याची आवश्यकता पडणार नाही. त्यामुळे त्रिस्तरीय समितीपुढे सादर करावयाचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

तलाठी, कृषी सहाय्यक व ग्रामसेवक ही तीनही पदे एकत्रित करण्यात यावीत. अशी पदे एकत्रित केल्याने सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास या तीनही कामास आवश्यक असलेले प्रशिक्षण दिल्यास तीनही पदाची कामे एकच कर्मचारी करु शकेल व पदे रिक्त राहणार नाहीत. या संदर्भात शासन स्तरावर विचार करण्यात आला असून वेगवेगळ्या क्षेत्रासाठी शासनाने वैशिष्ठपूर्ण सेवा निर्माण केल्या आहेत. तलाठी पदाचे काम भिन्न स्वरूपाचे आहे. सन १९६० मध्ये ही सर्व पदे एकत्र करण्याचा प्रयोग करण्यात आला होता. परंतू त्यामूळे अधिक गुंतागुंत निर्माण झाली. महसूल यंत्रणेकडे प्रशासन, कायदा व सुव्यवस्था वगैरे नियंत्रणाचे काम आहे. विकासाची कामे ग्रामपंचायत, पंचायत समिती यांच्याकडे आहेत. कृषी या पदास तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता आहे. या तीनही पदाची कामे वेगवेगळया स्वरूपाची आहेत. ती एकत्र केली तर अधिक गुंतागुंत निर्माण होऊ शकते. त्यामुळे एकत्र संवर्ग निर्माण करण्याची कल्पना शासनाने मान्य केली नाही. **असे जरी असले तरी कृषी सहायक आणि ग्रामसेवकांचा विचार करावयाचा झाला तर बहुतांशी गावात कृषी सहायक आढळून येत नाहीत. त्यामुळे कृषी सहाय्यक आणि ग्रामसेवक ही पदे एकत्रित करण्याचा फेर विचार करावा तसेच प्रत्येक ग्रामपंचायतील एक ग्रामसेवक देण्याच्या दृष्टीने ग्रामसेवकाची रिक्त असलेली पदे तीन वर्षात टप्याटप्याने भरण्याच्या दृष्टीने त्रिस्तरीय समितीपुढे प्रस्ताव सादर करून मान्यता घेऊन ग्रामसेवकाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही त्वरित सुरु करावी, या संदर्भात केलेल्या**

कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

चार : ग्रामसेवकांनी किती रक्कम काढावी याबाबत:-

ग्रामपंचायतीकडे जवाहर रोजगार योजना व अन्य योजना राबविण्यासाठी निधी दिला जातो उक्त निधी सध्या ग्रामसेवंकाकडे असतो. ग्रामसेवकांवर निधीच्या वापरासंबंधात कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याने नियंत्रण नाही. त्यामुळे निधीचा गैरवापर झाल्याची काही प्रकरणे समितीला तपासणीअंती दिसून आली. ग्रामसेवकांकडे असलेल्या निधीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण असण्याबाबत काय उपाययोजना करण्यात येत आहेत? असे समितीने साक्षीच्या वेळी सचिवांनी विचारले असता संबंधित कामाचे सर्वेक्षण तसेच मूल्यमापन झाल्याशिवाय दुसऱ्या कामासाठीचा निधी ग्रामसेवकांकडे देऊ नये अशा सूचना देण्यात येतील. तसेच ग्रामपंचायतीकडे असलेल्या निधीसाठी ग्रामपंचायतीसाठी वेगळी लेखा संहिता तयार करण्यात येत असून त्याची अंमलबजावणी सुमारे सहा महिन्यांत होईल. लेखा संहितेमध्ये ग्रामपंचायतीकडे असलेल्या निधीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण असण्याबाबत योग्य अशी तरतूद करण्यात येईल असे सचिवांनी समितीस सांगितले. ग्रामपंचायतीकडे असलेल्या निधीवर नियंत्रण राहण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या लेखा संहितेमध्ये ठोस अशी तरतूद करून उक्त लेखा संहितेची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यात यावी अशी समितीची शिफारस होती.

उपरोक्त शिफारशींवर शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

कनिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या ग्रामसेवकाला आर्थिक व्यवहारासंबंधी मार्गदर्शन होण्यासाठी तसेच ग्रामपंचायतीकडे असलेल्या निधीवर नियंत्रण राहण्यासाठी लेखा संहितेची आवश्यकता होती. याबाबत विचार करून शासनाने १९९० साली एक समिती गठीत करून त्या समितीकडे ग्रामपंचायतीसाठी लेखा संहिता तयार करण्याचे काम सोपविले. सदर समितीने आपला अहवाल १९९१ मध्ये विभागाला सादर केला. परंतु मध्यंतरीच्या काळात सदर अहवालावर कोणतीच कार्यवाही झाली नाही. म्हणून पूर्वीचे प्रारूप आधारभूत धरून व

दरम्यानच्या काळात झालेले बदल लक्षात घेऊन ग्रामपंचायत लेखा संहितेच्या प्रारूपामध्ये सुधारणा करण्यासाठी एक समिती उप सचिव श्रीमती चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४ फेब्रुवारी, २००२ च्या आदेशान्वये गठीत करण्यात आली. सदर समितीमध्ये उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सहायक लेखाधिकारी, ग्रामसेवक, महालेखापाल कार्यालयातील वरिष्ठ लेखाधिकारी,, सहायक लेखाधिकारी यांचा समावेश होतो. सदर समितीने एकूण आठ बैठका घेऊन ग्रामपंचायत लेखा संहितेचे सुधारित प्रारूप दिनांक २२ ऑक्टोबर, २००२ रोजी ग्रामविकास विभागास सादर केले. सदर प्रारूपास विधी व न्याय विभाग, वित्त विभाग व स्थानिक निधी लेखा विभाग यांची मान्यता घेतलेली आहे. सदर ग्रामपंचायत लेखा संहिता प्रारूपातील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत :-

(१) वित्तीय औचित्याची सुत्रे यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(२) प्रतिभूती ठेवीच्या रकमा विहित केल्या असून ठेव नोंदवही व नमुना घालून दिलेला आहे. (३) आर्थिक व्यवहार व लेखे या दोन्हीबाबत सचिव व सरपंच या दोघांना संयुक्तरित्या जबाबदार धरावे असे धोरण ठेवून सचिवावर सरपंचाचे पर्यवेक्षण राहील अशी व्यवस्था सुचविण्यात आली आहे.

(४) सचिव व सरपंच यांची कर्तव्ये सविस्तरपणे विहित केलेली आहेत.

(५) ग्रामनिधीच्या गुंतवणुकीबाबत मुदत ठेवीच्या स्वरूपात गुंतवणूक करण्याची परवानगी अंतर्भूत केली आहे.

(६) प्राप्त धनादेश वठविल्याशिवाय रोख पुस्तिकेत नोंद घेऊ नये याबाबतच्या सुचना समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

(७) धनादेशावर सरपंच व ग्रामसेवक या दोघांच्याही सहीची तरतूद ठेवण्यात आलेली आहे.

(८) ग्रामपंचायतीला प्राप्त होणाऱ्या देगणीसाठी नोंदवही विहित करण्यात आली असून रोख किंवा वस्तु स्वरूपातील देणगीतील नोंद ठेवण्यासाठी रकाने विहित केलेल आहेत.

(९) राज्य शासन व केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानासाठी स्वतंत्र अनुदान नोंदवही ठेवण्याची तरतूद केली असून अनुदान नोंदवहीचा नमुना विहित करण्यात आलेला आहे.

(१०) रु. २०००० च्या वर खरदीसाठी निविदा मागविणे बंधनकारक असून निविदा स्वीकृतीचे अधिकार स्पष्ट करण्यात आले आहेत.

(११) रु ५०००० पेक्षा अधिक खर्चाच्या कामासाठी जाहीर निविदा मागविण्याचे बंधनकारक केले आहे. तसेच किती टक्के जादा दराची निविदा मान्य करता येईल याची मर्यादा स्पष्ट करण्यात आली आहे.

(१२) ग्रामपंचायतीने केलेल्या सर्व बांधकामाची नोंद किंवा पुरविलेल्या सामग्रीचे मोजमाप पंचायत समितीच्या उप अभियंत्याकडून करण्यात येईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

(१३) ग्रामपंचायतीसाठी पूर्वी फक्त २७ नमुने विहित केले होते. त्यामध्ये आता ९ अधिक नमुन्यांचा समावेश केला आहे. त्यात प्रामुख्याने गुंतवणूक नोंदवही, मासिक जमाखर्चाचे विवरण, लेखा आक्षेपांचा पुर्तता अहवाल, महिला व मागासवर्गीयासाठी राखून ठेवलेल्या निधीचा खर्च, कर्ज नोंदवही व वृक्ष नोंदवही यांचा समावेश आहे.

सदर प्रारूप संबंधित सर्व व्यक्तिच्या माहितीसाठी महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १३ मे, २००५ च्या **असाधारण राजपत्रात** प्रसिध्द करण्यात आले. त्यावर काही सूचना व हरकती शासनास प्राप्त झाल्या.

ग्राम सेवकाने किती रक्कम काढावी या संदर्भात समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने कार्यवाही केली आहे. सदरहू माहितीच्या आधारे अधिक माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी समितीने दिनांक १३ मे, २००८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला अशी माहिती दिली की, कनिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या ग्रामसेवकाला आर्थिक व्यवहारासंबधी मार्गदर्शन होण्यासाठी तसेच ग्रामपंचायतीकडे असलेल्या निधीवर नियंत्रण राहण्यासाठी लेखा संहितेची आवश्यकता होती. या संहितेची गरज लक्षात घेता ही नियमावली थेट सभागृहास सादर करण्यात यावी. त्या ठिकाणी यासंबंधी चर्चा होईल. सभागृहाने केलेल्या सूचनांना समावेश नियमावलीत करता येईल व नंतर त्याला अंतिम मंजुरी देता येईल, असे प्रस्तावित आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

ग्राम पंचायतीकडे असलेल्या निधीवर नियंत्रण राहण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या लेखा संहितेमध्ये ठोस तरतूद करुन उक्त लेखा संहितेची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यात यावी. या संदर्भात शासनाने केलेली कार्यवाही तसेच साक्षीच्यावेळी विभागीय सचिवांनी केलेला खुलासा विचारात घेता समितीचे समाधान झाले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी समितीचे अभिप्राय व शिफारशी नाहीत.

पाच : कमी वजनाचे लोखंडी पत्रे असल्याने परत करण्याबाबत :-

समितीने वर्धा जिल्हा परिषदेअंतर्गत समुद्रपूर पंचायत समितीला भेट देऊन इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलासाठी वापरण्यात येणाऱ्या लोखंडी टीन पत्र्यांची पाहणी केली असता सदरहू लोखंडी टीनचे सर्व पत्रे आवश्यक त्या जाडीचे व आवश्यक त्या वजनाचे नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. समितीने याबाबत विचारणा केली असता प्रकल्प संचालक, श्री. शुक्ला, ग्रामविकास यंत्रणा यांनी समितीस वस्तुस्थितीत धरुन माहिती दिली नसून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला असल्याचे समितीस आढळून आले आहे. समितीने सचिवांच्या साक्षीच्या वेळी ही बाब सचिव, ग्रामविकास विभाग यांचे निदर्शनास आणली असता सदरहू लोखंडी टीन पत्रे हे आवश्यक त्या जाडी व वजनाचे नसल्याचे तसेच ते "स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया" कडून खरेदी केल्याचे समितीस सांगितले, तसेच सदरहू पत्रे हे घरकुलासाठी नसून अंगणवाडीच्या स्वयंपाक छप्पर (किचन शेड्स) बांधण्यास विकत घेतल्याचे समितीस सांगितले.

समितीने वेगवेगळ्या जिल्हा परिषदांना भेट देऊन तेथील लोखंडी टीन पत्र्यांची पाहणी केली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, सदरहू पत्रे हे आवश्यक त्या जाडीचे नसून कमी वजाचे तसेच कमी दर्जाचे असल्याचे आढळले. जिल्हा परिषदांमार्फत "स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया" कडून सदरहू पत्र्याची खरेदी-विक्री केली जात असून मागणीप्रमाणे पत्रे सदरहू संस्थेकडून प्राप्त होत नाहीत. परिणामत: निकृष्ट दर्जाचे पत्रे लाभार्थ्यांना पुरवठा केला जात असून " स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडियाला" सुस्वातीला मागणी केल्याप्रमाणे लोखंडी पत्र्यांची

देयके दिली जातात. परिणामत: शासनाचे नुकसान होते. स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडियाकडून लोखंडी पत्र्यांची खरेदी करीत असताना त्यांच्याकडून आलेल्या लोखंडी पत्र्यांचे वजन करुन त्या वजनाप्रमाणे देयके द्यावीत अशी या प्रकरणी समितीने आपल्या अहवालात शिफारस केली होती. पत्रे खरेदी प्रकरणी भेटीच्या वेळी समितीला वस्तुनिष्ठ माहिती मिळू शकली नाही. समितीने जिल्हा परिषदांना दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषदांच्या संबंधित खाते प्रमुखाकडे योग्य व वस्तुनिष्ठ माहिती नसते असे समितीला आढळून आले आहे. समितीला जिल्हा परिषदेच्या भेटीच्या वेळी संपूर्ण व वस्तुनिष्ठ माहिती मिळण्याच्या दृष्टीने ग्रामविकास विभागाने सर्व जिल्हा परिषदांना एक परिपत्रक काढून जिल्हा परिषदांच्या खाते प्रमुखांनी त्यांच्याकडे असलेल्या विषयांचा सांगोपांग अभ्यास करुन समितीला वस्तुनिष्ठ व योग्य ती माहिती पुरवावी असे आदेश देण्यात यावेत व या संदर्भात निर्गमित केलेल्य परिपत्रकांची एक प्रत समितीला पाठविण्यात यावी अशीही समितीने शिफारस केली होती.

समितीने केलेल्या उपरोक्त शिफारशी संदर्भात जिल्हा परिषदेने तसेच शासनाने केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे:-

स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडियाकडून लोखंडी पत्र्यांची खरेदी करीत असताना त्यांच्याकडून आलेल्या लोखंडी पत्र्याचे वजन करुन त्या वजनाप्रमाणे देयके देणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच समितीला जिल्हा परिषदेच्या भेटीच्या वेळी संपूर्ण व वस्तूनिष्ठ माहिती मिळण्याच्या दृष्टीने व ग्रामविकास विभागाने सर्व जिल्हापरिषदांना एक परिपत्रक काडून आदेश देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

पंचायती राज समितीस आवश्यक असलेली वस्तुस्थितीदर्शक माहिती मागितल्यास तात्काळ देण्यात यावी अशा सूचना सर्व जिल्हा परिषदांना परिपत्रक क्रमांक पंरास २००१/प्र.क्र.१०७/जल-१७, दिनांक २२ जून, २००१ अन्वये देण्यात आल्या आहेत.

या प्रकरणी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १३ मे, २००८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असा खुलासा केला की, समितीने यासंदर्भात अशी शिफारस केली होती की, स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडियाकडून लोखंडी पत्र्यांची खरेदी करीत असताना त्यांच्याकडून आलेल्या लोखंडी पत्र्याचे

वजन करुन त्या वजनाप्रमाणे देयके अदा करावीत यानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचे सचिवांनी नमूद केले. याबाबत समितीने समाधान व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी:-

स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडियाकडून लोखंडी पत्र्यांची खरेदी करीत असताना त्यांच्याकडून आलेल्या लोखंडी पत्र्यांचे वजन करुन त्या वजनाप्रमाणे देयके द्यावीत. तसेच लाभार्थीना टीन पत्र्यांचे वाटप करताना आवश्यक जाडीचे व योग्य टीन पत्रे न मिळाल्याचे आढळून आलेले आहे, म्हणजेच टीन पत्रे खरेदी करताना जे निकष ठरविण्यात आले होते, त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे टीन पत्रे देण्यात आलेले आहेत. सबब लाभार्थ्यांसाठी टीन पत्रे खरेदी करताना निकषानुसार खरेदीबाबत कार्यवाही व्हावी अशी समितीची शिफारस आहे.

जिल्हा परिषद, लातूर (प्रशासन)

सहा : गणवेष वाटप :-

शासनाने मागासवर्गीय व दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांची शाळेमधील उपस्थिती वाढावी यासाठी लेखन सामग्री व गणवेष वाटपाची योजना सन १९९६-९७ पासून सुरु केली आहे. समितीने लातूर जिल्हा परिषदेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची याबाबत साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी पहिली ते चौथी इयत्तेत सन १९९७-९८ मध्ये एकूण किती विद्यार्थी होते, तसेच फक्त जिल्हा परिषदेतील शाळेतील विद्यार्थ्यांनाच गणवेष वाटप करण्यात येते काय, तसेच प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या किती आहे, गणवेष वाटपात मागासवर्गीय व दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे काय, गणवेषास पात्र विद्यार्थ्यांची संख्या किती व लाभार्थी विद्यार्थ्यांची निवड करताना कोणते निकष लावण्यात आले? इत्यादीबाबत समितीने विचारणा केली असता समितीला लातूर जिल्हा परिषदेकडून समाधानकारक माहिती प्राप्त झाली नाही. विभाग प्रमुख मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना माहिती देण्याबाबत सहकार्य करीत नाहीत असेही समितीला दिसून आले. याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. या प्रकरणी शासनाने त्वरीत लक्ष घालून जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांना समज द्यावी अशी समितीने आपल्या सहाव्या अहवालात शिफारस केली होती.

समितीने तपासणी केलेल्या जिल्हा परिषदांमध्ये गणवेष वाटपाबाबत अनेक प्रकारच्या विसंगती दिसून आल्या. काही जिल्हा परिषदांमध्ये गणवेषाच्या २ संचाचे तर काहीमध्ये १ संचाचे वाटप झाल्याचे तर काही ठिकाणी गणवेषाच्या अभावी एका विद्यार्थ्यास पँट तर दुसऱ्यास शर्ट, एका विद्यार्थीनीला स्कर्ट तर दुसरीला ब्लाऊज अशा प्रकारे वाटप झाल्याचे समितीस दिसून आले. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागास गणवेष वाटपाबाबत सुस्पष्ट धोरणही माहिती नाही. गणवेष वाटपाबाबत जिल्हा परिषदांमध्ये वेगवेगळ्या पध्दतीचा अवलंब केल्याचे समितीस आढळून आले. त्यामुळे राज्यात गणवेष वाटपाबाबत सुसूत्रता येण्यासाठी एक मार्गदर्शनपर परिपत्रक त्वरीत निर्गमित करावे व परिपत्रकांची प्रत समितीस पाठवावी याची अशीही समितीने शिफारस केली होती.

विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात गणवेषाची कमतरता पडत असेल तर संबंधित शिक्षणाधिकारी त्यांची मागणी करीत नाहीत, शिक्षणाधिकारी व पदाधिकारी यांच्यामध्ये याबाबत संवादाचा अभाव आढळतो. तसेच त्यांच्यात समन्वय आढळून येत नाही. पदाधिकाऱ्यांचे या बाबींकडे लक्ष नाही याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

गणवेष वाटपाबाबत जिल्हा परिषदांमध्ये वेगवेगळ्या पध्दतीचा अवलंब केल्याचे समितीस आढळून आले. राज्यात गणवेष वाटपाबाबत सुसूत्रता येण्यासाठी एक मार्गदर्शनपर परिपत्रक निर्गमित करण्याबाबत समितीने शिफारस केली होती. त्या अनुषंगाने विभागाने परिपत्रक काढले असून त्याची एक प्रत समितीस प्राप्त झाली आहे. (परिशिष्ट-अ) साक्षीच्या वेळी सदर प्रकरणी समितीने दिनांक १३ मे, २००८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असा खुलासा केला की, जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व १०३ विकास गटातील पहिली ते चौथीतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेष व लेखन साहित्य योजनेसंदर्भात शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय क्रमांक :पीआरई २०००/(९७८/२०००) प्राशि-४, दिनांक १२ डिसेंबर, २००१ निर्गमित केला आहे. राज्यातील १०३ विकास गटातील जिल्हा परिषदांच्या इयत्ता पहिली ते चौथीमधील सर्व विद्यार्थ्यांना लागू केलेली आहे. या दोन्ही योजनांसाठी दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीतून सर्व लाभार्थींना गणवेषाचे वाटप करणे शक्य होत नसल्यामुळे काही जिल्ह्यांमध्ये लाभार्थी या योजनेपासून वंचित राहतात. म्हणून या योजनेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी व त्याचा लाभ

गरजू विद्यार्थ्यांना मिळावा याकरिता योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये निश्चित स्वरूपाचे प्राथम्यक्रम ठरविण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, शालेय शिक्षण विभागाने आदर्श परिपत्रक काढले आहे परंतु त्याची आदर्श अंमलबजावणी का होत नाही. पंचायती राज समितीने चंद्रपूर जिल्ह्याला भेट दिली होती त्यावेळी समितीला हा अनुभव आलेला आहे. चंद्रपूर प्रमाणेच इतरही जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नाही. या संदर्भात खुलासा करावा. तसेच खरोखरच विद्यार्थ्यांना जून महिन्यात गणवेष मिळतो काय ? विद्यार्थ्यांना जून महिन्यामध्ये नव्हे तर ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात गणवेष मिळतात. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी समितीला असा खुलासा केला की, गणवेष पुरविण्याचे काम ग्राम शिक्षण समितीला देण्यात येते. ग्राम शिक्षण समित्यांचे म्हणणे आहे की, गणवेषासाठी जे पैसे मिळतात ते कमी पडतात. पुढे समितीने अशी पृच्छा केली की, गणवेष खरेदी करण्यासाठी कोणामार्फत तरतूद केली जाते ? त्यावर शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांनी समितीला अशी माहिती दिली की शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्यामार्फत तरतूद केली जाते. समितीने याबाबत त्यांना अशी विचारणा केली की, आपल्याकडून वेळेवर पैसे न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना जून महिन्यामध्ये गणवेष मिळत नाही. जून महिन्यात शाळा सुरु होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना जून महिन्यातच पाठ्यपुस्तके आणि गणवेष मिळावयास पाहिजेत. त्या दृष्टीने एप्रिल महिन्यामध्ये निधी वितरीत करावयास पाहिजे. पंरतु एप्रिल महिन्यामध्ये निधी वितरीत केला जात नाही ही वस्तुस्थिती आहे.

गणवेषाच्या बाबतीत चालू वर्षाची परिस्थिती काय आहे ? त्यावर शिक्षण संचालकांनी अशी माहिती दिली की, या वर्षासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. जून महिन्यात गणवेष मिळतील याबाबत काळजी घेतली जाईल. समितीने लातूर आणि नाशिकच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेला गणवेष खरेदीसाठी निधी मिळाला आहे काय ? शिक्षण संचालकांनी खुलासा केली की, गणवेष खरेदीसाठी या महिन्यात निधी वितरित करण्यात आलेला आहे की मागील महिन्यात वितरित करण्यात आलेला आहे याबाबतची माहिती घेऊन सांगतो असे सांगितले. या संदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, राज्यातील अनेक शाळा या वर्षी दिनांक २६ जून रोजी पासून सुरु होणार आहेत विभागाने दिनांक १२ डिसेंबर, २००१ रोजी जे परिपत्रक काढलेले आहे. त्याची अंमलबजावणी होण्याच्या

दृष्टीकोनातून संबंधित जिल्हा परिषदांना निधी जाणे आणि शाळा सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना गणवेष मिळणे आवश्यक आहे.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व १०३ विकास गटातील पहिली ते चौथीतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेष व लेखन साहित्य योजनेसंदर्भात शालेय शिक्षण विभागाने शासन निर्णय क्रमांक पीआरई २००० (९७८/२०००) प्राशि-४, दिनांक १२ डिसेंबर, २००१ निर्गमित केला आहे. पंरतु सदर निर्गमित केलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी होत नाही. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या मार्फत गणवेष खरेदीकरिता निधीची तरतूद केली जाते. पंरतु निधी वेळेवर उपलब्ध केला जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांना जून महिन्यात गणवेष मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. **तरी राज्यातील जिल्हा परिषदांना दिनांक १२ डिसेंबर, २००१ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून निधीची पुर्तता करण्यात यावी आणि शाळा सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना गणवेष मिळण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

सात : प्राथमिक शाळा, बोरफळ, तालुका औसा, जिल्हा लातूर येथील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य न मिळाल्याबाबत.

बोरफळ, तालुका औसा, जिल्हा लातूर येथील जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या प्राथमिक शाळेची तपासणी समितीने केली असता सन १९९६-९७ या वर्षासाठी लेखन साहित्य शाळेला प्राप्त झाले नसल्याचे समितीला आढळून आले. तसेच साठा नोंदवहीमध्ये विद्यार्थ्यांचे, अगदी अलिकडचे अंगठे घेऊन लेखन साहित्य प्राप्त झाल्याची खोटी कागदपत्रे तयार केल्याचेही समितीला आढळून आले. याबाबत समितीने साक्षीच्या वेळी शिक्षणाधिकाऱ्यांना विचारले असता, शिक्षण साहित्य मिळाले आहे. पंरतु मुख्याध्यापकांना ते दाखविता आले नाही अशी सारवा-सारव समितीसमोर करण्याचा त्यांनी प्रत्यन केला. वस्तुत: साठा नोंदवहीमध्ये विद्यार्थ्यांचे अगदी अलिकडील आंगठे घेऊन लेखन साहित्य प्राप्त झाले असल्याची बनावट

कागदपत्रे तयार करण्यात आल्याचे समितीला तपासणीच्या वेळी दिसून आले. खोटा अभिलेख तयार करणाऱ्या मुख्याध्यापकांविरुध्द तसेच शिक्षणाधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात येईल अशी विचारणा समितीने साक्षीच्या वेळी सचिवांना केली असता, सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस सांगितले की, संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांची आता बदली करण्यात आली असून निवृत्त झालेल्या संबंधित मुख्याध्यापकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासनाने केलेल्या कारवाईबाबत समिती समाधान व्यक्त करते. तसेच मुख्याध्यापकांविरुध्द दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याबाबत पाठपुरावा करण्यात यावा, अशी समितीने या प्रकरणी आपल्या सहाव्या अहवालात शिफारस केली होती.

उक्त प्रकरणी शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

श्री.शेख एन.एम. माजी मुख्याध्यापक, जि.प.प्रा.शाळा बोरफळ, ता. औसा, जि. लातूर यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत दिनांक २० जानेवारी, २००१ रोजी सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, औसा यांच्याकडे अर्ज दिलेला आहे. याबाबत दिनांक २९ जानेवारी, २००१ दिनांक २६ मार्च, २००२, दिनांक २२ जुलै, २००२ व दिनांक ३० एप्रिल, २००८ रोजी पाठपुरावा करण्यात आला आहे.

प्राथमिक शाळा, बोरफळ (ता.औसा) येथील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य न मिळाल्याबाबत दिनांक १३ मे, २००८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असा खुलासा केला की, श्री.एन.एम.शेख, माजी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, बोरफळ, ता.औसा, जि. लातूर यांच्याविरुध्द फिर्याद दाखल करण्यात आली आहे. वास्तविक पाहता विद्यार्थ्यांना लेखन साहित्याचे वाटप करण्यात आले होते. परंतु भेटीच्या वेळी त्याबाबतचे रेकॉर्ड दाखविण्यात आले नव्हते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मुख्याध्यापकाने भीतीपोटी रेकॉर्ड आणून दाखविले. त्या रेकॉर्डची तपासणी केली असता, मुख्याध्यापकांनी केलेले वर्तन अशोभनीय असल्यामुळे त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर दाखल करण्यात आलेला गुन्हा अदखलपात्र असल्यामुळे पोलिसांनी त्या बाबतीत केवळ चौकशी केली. पंरतु कसल्याही प्रकारची कारवाई केली नाही. खरे म्हणजे न्यायालयात थेट तक्रार दाखल करण्याची तरतूद कायद्यामध्ये

त्यानुसार संबंधित मुख्याध्यापकांविरुध्द न्यायालयात थेट तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. संबंधित मुख्याध्यापकांविरुध्द दोन्ही प्रकारची कारवाई करण्यात आलेली आहे. प्रकरण कोर्टात गेल्यामुळे श्री.एन.एम.शेख, माजी मुख्याध्यापक यांच्यावर अंतिम कारवाई न्यायालयाकडूनच करण्यात येणार आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, मुख्याध्यापकांविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत दिनांक २१ जानेवारी, २००१ रोजी अर्ज दिलेला असताना, दिनांक २२ जुलै, २००२ नंतर दिनांक ३० एप्रिल, २००८ रोजी पाठपुरावा करण्यात आलेला आहे. पाठपुरावा करण्यामध्ये एवढा खंड का पडला ? याबाबत प्रधान सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, दिनांक २९ जानेवारी, २००१, दिनांक २६ मार्च, २००२, दिनांक २२ जुलै, २००२ अशा प्रकारे पाठपुरावा करण्यात आला होता. त्यानंतर एका वर्षाने पुन्हा सहा महिन्यांनी व नंतर नुकताच म्हणजे दिनांक ३० एप्रिल, २००८ रोजी फार उशीरा पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

श्री. एन.एम.शेख, माजी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, बोरफळ, ता. औसा, जि. लातुर यांनी विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या लेखन साहित्यांचे दप्तर भेटीच्या वेळी दाखविण्यात आले नाही. परंतु नंतर स्वत: आणून दाखविले त्यावेळी तपासणी केली असता ते खोटे असल्याचे सिध्द झाले. त्यानुसार मुख्याध्यापककांविरुध्द न्यायालयात तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. त्यामुळे श्री. एन.एम.शेख, माजी मुख्याध्यापक यांच्यावर अंतिम कारवाई ही न्यायालयाकडून करण्यात येणार असल्यामुळे सदर प्रकरणी समितीचे काही अभिप्राय व शिफारशी नाहीत.

परिशिष्ट 'अ '

(शासन निर्णय व परिपत्रके)

ग्रामपंचायतींची विहित वेळेत

तपासणी होणेबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व जलसंधारण विभाग,

परिपत्रक क्र. पंरास १५००/प्र.क्र, ५९०/२०

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दि. २७ जुलै, २००१.

परिपत्रक :-

पंचायत राज समितीच्या दिनांक २१, २२ व २३ जून २००० रोजी जिल्हा परिषद, नाशिक भेटीच्या वेळी पंचायत समिती, कळवण अंतर्गत ग्रामपंचायतीमधील एकूण ८ गैरव्यवहाराची प्रकरणे आढळून आली. सदर ग्रामपंचायतींकडील गैरव्यवहाराची रक्कम रु. २,११,१३५/- इतकी वसुलीपात्र रक्कम असल्याचे निदर्शनास आले. ग्रामपंचायतीमध्ये अशा प्रकारे गैरव्यवहार होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. विशेषत: ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी/सरपंच ग्रामपंचायतीमधील गैरव्यवहारात गुंतलेले असतात. याबाबत पंचायती राज समितीने ग्रामपंचायतींची वेळोवेळी तपासणी होत असल्याने गैरव्यवहाराचे प्रकार आढळून येत असल्याचे मत व्यक्त केलेले आहे. तरी यापुढे ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार होऊ नयेत याची दक्षता घेण्यात यावी. तसेच ग्रामपंचायतींचे तपासणीचे काम वेळोवेळी व विहित कालावधीत गट विकास अधिकारी व विस्तार अधिकरी यांनी करणे आवश्यक आहे. तरी गट विकास अधिकरी व संबंधित विस्तार अधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील ग्रामपंचायतीचे तपासणी काम वेळोवेळी पूर्ण करून आढळून येणाऱ्या अनियमिततेबाबत त्वरित कार्यवाही करावी अशा सूचना सर्व गट विकास अधिकाऱ्यांना व विस्तार अधिकांऱ्याना देण्यात याव्यात. याबाबत संबंधित गट विकास अधिकारी व ग्रामपंचातींना भेटी देतात किंवा नाही याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी वारंवार तपासणी करावी व नियंत्रण ठेवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जयलक्ष्मी चेक्कला,

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

<u>ग्रामपंचायतींची विहित वेळेत तपासणी होणेबाबत</u>

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व जल संधारण विभाग

परिपत्रक क्र.पंरास. १५००/प्र.क्र.५९०/२०

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दि. २७ जुलै, २००१.

वाचावे : शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पंरास. १५००/ प्र.क्र. ५९०/२०, दिनांक २७ जुलै, २००१.

शुध्दीपत्रक :

वर नमूद करण्यात आलेल्या संदर्भाधीन शासन परिपत्रकातील मसुद्यात सहाव्या ओळीत "असल्याने" या शब्दाऐवजी "नसल्याने" हा शब्द वाचावा.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जयलक्ष्मी चेक्कला,

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व १०३ विकास गटातील इयत्ता पहिली ते चौथीतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेष व लेखन साहित्य योजना सुयोग्य अंमलबजावणीबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक : पीआरई. २००/(९८७/२०००)/ प्राशि-४,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक १२ डिसेंबर, २००१.

संदर्भ :- (१) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक : पीआरई १०७८/११०१६०/(२६६६)VII, दिनांक २०/६/१९७९.

(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक : पीआरई. १०९६/(४८/९६) प्राशि ४, दिनांक १३/९/१९९६.

(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक : पीआरई. १९०९२/९७२७/प्राशि १, दिनांक १३/१२/१९९६.

शासन निर्णय :

राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या इयत्ता चौथीमधील विद्यार्थ्यांना विशेष सुविधेअंतर्गत मोफत गणवेष व लेखन साहित्य पुरविण्याची योजना राज्यामध्ये १९७६-७७ या शैक्षणिक वर्षापासून राबविण्यात येत आहे. ही योजना संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक - २ अन्वये राज्यातील १०३ विकास गटातील जिल्हा परिषदांच्या इयत्ता पहिली ते चौथीमधील सर्व विद्यार्थ्यांना लागू केलेली आहे. या दोन्ही योजनांसाठी दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीतून सर्व लाभार्थींना गणवेषाचे वाटप करणे शक्य होत नसल्यामुळे काही जिल्ह्यांमध्ये लाभार्थी या योजनेपासून वंचित राहतात. म्हणून या योजनेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी व त्याचा लाभ गरजू विद्यार्थ्यांना मिळावा याकरिता योजनेच्या लाभार्थ्यामध्ये स्वरूपाचे प्राथम्यक्रम ठरविण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

(१) सदर योजनेंतर्गत विद्यार्थ्यास एक गणवेष संच देण्यात यावा.

(२) राज्यामध्ये सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापासून वस्तीशाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत. त्या शाळांमध्ये समाजातील दुर्बल घटकातील विद्यार्थी शिक्षण घेत असल्यामुळे

वस्तीशाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेष पुरवठा व लेखन साहित्य योजना सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात यावी.

(३) उपरोक्त योजनांसाठी दरवर्षी उपलब्ध होणार निधी व लाभार्थी संख्या विचारात घेऊन पुढीलप्रमाणे प्राथम्य निश्चित करण्यात येत आहे :-

(१) वस्तीशाळेमध्ये शिकणारे सर्व विद्यार्थी यांना प्रथम प्राधान्याने गणवेष पुरवठा लेखन साहित्य योजनेचा लाभ देण्यात यावा.

(२) इयत्ता पहिली ते चौथीमधील दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती-जमाती विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील सर्व विद्यार्थी.

(३) उपरोक्त (१) व (२) गटातील विद्यार्थ्यांना गणवेष पुरवठा करून निधी शिल्लक राहिल्यास १०३ विकास गटातील सर्वसाधारण संवर्गातील दारिद्रय रेषेखालील इयत्ता पहिली ते चौथीमधील मुलींना याचा लाभ देण्यात यावा. हा लाभ देताना इयत्ता पहिली, दुसरी, तिसरी व चौथी या क्रमाने प्राथम्य ठरविण्यात यावे.

(४) उपरोक्त तिन्ही गटातील विद्यार्थ्यांना गणवेष वाटप करूनही निधी शिल्लक राहिल्यास १०३ विकास गटातील सर्वसाधारण संवर्गातील दारिद्रय रेषेखालील इयत्ता पहिली ते चौथीमधील मुलींना लाभ द्यावा.

वरिल आदेशांची अंमलबजावणी सन २००२-२००३ या वर्षी गणवेष वाटप करतेवेळी करण्यात यावी.

हा शासन निर्णय ग्राम विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.ह.उमराणीकर),

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,

परिशिष्ट 'ब '

(समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त)

मंगळवार, दिनांक १३ मे, २००८

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

(१) श्री. राजन पाटील, वि.स.स., तथा समिती प्रमुख

(२) श्री. नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.

(३) श्री. दिलीप बनसोडे, वि.स.स.

(४) रमेशचंद्र बंग, वि.स.स.

(५) विरेंद्र जगताप, वि.स.स.

(६) सुनील केदार, वि.स.स

(७) कैलास पाटील, वि.स.स.

(८) सदाशिवराव लोखंडे, वि.स.स

(९) श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. वि. वा. देशमुख, उप सचिव,

श्री. ता. नि. मिसाळ, अवर सचिव.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. विद्याधर कानडे, प्रधान सचिव, वित्त विभाग (व्यय),

(२) श्री. एस. के. गोयल, प्रधान सचिव, सहकार विभाग, (अतिरिक्त कार्यभार ग्रा.वि.वि.),

(३) श्री. सुनिल चव्हाण, विशेष कार्य आधिकारी, ग्राम विकास विभाग,

(४) श्री. एम. आर. कदम, शिक्षण संचालक (प्राथ), पुणे-१,

(५) श्री नाना रौराळे, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग,

(६) श्री दीपक चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक,

(७) श्री जगन्नाथ भोर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर,

(८) श्री प्रवीण गेडाम, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर,

(९) श्रीमती लीना बनसोड, प्रकल्प संचालक, जि. ग्रा. वि. यं., जिल्हा परिषद, वर्धा.

विभागीय कार्यवृत्त :

समितीने सहाव्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात प्रधान सचिव, वित्त विभाग (व्यय), प्रधान सचिव, सहकार विभाग, विशेष कार्य अधिकारी, ग्रामविकास विभाग, शिक्षण संचालक तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक, वर्धा व लातूर यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ९ सप्टेंबर, २००८

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

(१) श्री. सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.

(३) श्री. रमेशभाई कदम वि.स.स.

(४) श्री. संपतराव अवघडे, वि.स.स.

(५) श्री. डी. एस. अहिरे, वि.स.स.

(६) श्री. तुकाराम सुर्वे, वि.स.स.

(७) श्रीमती. अनुसया खेडकर, वि.स.स

(८) श्री. टी. पी. कांबळे, वि.स.स.

(९) श्री. विष्णू सवरा, वि.स.स.

(१०) श्री. हेमंत पटले, वि.स.स.

(११) श्री. राजन तेली, वि.प.स.

(१२) श्री. एम. एम. शेख, वि.प.स.

(१३) श्री. विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

(१४) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. भा. ना. कांबळे, सह सचिव,

श्री. वि. ना. देशमुख, उप सचिव,

श्री. ता. नि. मिसाळ, अवर सचिव,

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने चौथ्या अनुपालन अहवालाच्या प्रास्तावर विचार करून काही सुधारणांसह संमत केला.